# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण

एप्रिल, २०१०

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,   मुंबई

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यववस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०**


| | |
|---|---|
| १. संक्षिप्त शीर्षक, लाग करणे, प्रारंभ आणि अर्थनिश्चिती | ३ |
| २. व्याख्या | ४ |
| ३. मुलभूत तत्त्वे | ५ |
| ४. खर्चाच्या परिणामकारकतेच्या निर्धारणाच्या पद्धतींची व्याप्ती | ५ |
| ५. खर्चाच्या परिणामकारकतेचे निकष | ६ |
| ६. विजेच्या तुटवड्याच्या परिसस्थितीकरीता दुरुस्त करावयाचे घटक | १२ |
| ७. चाचण्यांमध्ये वापरलेल्या महत्त्वाच्या घटकांची किंमत | १२ |
| ८. अडचणी दूर करण्याचे अधिकार | १३ |
| ९. आदेश आणि आदेशिका निर्गमित करणे | १३ |
| १०. सुधारणा करण्याचे अधिकार | १३ |
| जोडपत्र-१ : पीसीटी व एससीटी चाचण्या करावयाच्या पध्दती | १४ |

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यववस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०

### विद्युत अधिनियम २००३

क्र. मविनिआ/लिगल/१११/२०१०/१८१ .विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १८१ चे उप-कलम (१) आणि कलम १८१ च्या उप-कलम (२)च्या खंड (झेडपी ) ने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, वितरण परवानाधारकाने डीएसएम कार्यक्रमांवरील खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण करण्यासाठी आणि त्यासंबंधित वसूल करावयाच्या आकारासंबंधी तत्त्वे व पध्दतीसाठी आणि त्यास आनुषंगिक व सहाय्यभूत बाबींकरिता खालील प्रमाणे विनियम करीत आहे.

### १. संक्षिप्त शीर्षक, लागू करणे, प्रारंभ आणि अर्थनिश्चिती

१.१ या विनियमांना, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यववस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०", असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

१.४ या विनियमांचा अर्थ, वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१०, मधील तरतुदींशी सुसंगतपणे लावण्यात येईल.

## २. व्याख्या

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये :

(ए) **"अधिनियम"** म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेला विद्युत अधिनियम २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"टाळलेले खर्च"** म्हणजे वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रम कार्यान्वित करताना वितरण परवानाधारकाने वीज खरेदी करण्यसाठी टाळलेला किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या/नवीन वितरण यंत्रणेची श्रेणीवाढ करण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक पुढे ढकलल्यामुळे किंवा टाळल्यामुळे न करावा लागणारा वाढीव खर्च;

(सी) **"खर्चाची परिणामकारकता"** म्हणजे वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांतील कोणत्याही गुंतवणूकीची सापेक्ष कामगिरी किंवा आर्थिक आकर्षकतेचा निर्देशक किंवा अशी गुंतवणूक केलेली नसताना निर्मिती केलेल्या आणि पुरवठा केलेल्या विजेवरील खर्चाशी केलेली तुलना;

(डी) **"डीएसएम"** म्हणजे वीज मागणी व्यवस्थापन.

(ई) **"डीएसएम सल्लागार समिती"** म्हणजे डीएसएम कार्यक्रम मंजूर करण्याची प्रक्रिया आयोगास सुलभ व्हावी यासाठी स्थापन केलेली समिती. या समितीचा आमंत्रक आयोगाचा सचिव असेल;

(एफ) **"वीज मागणी एक स्त्रोत"** म्हणजे डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित केल्यामुळे वीज वापरात (युनिट) आणि / किंवा मागणीत होणारी बचत, जिला तीन महत्वाचे अंग असतील: परिमाण- किती उपलब्ध आहे (युनिट आणि किंवा विद्युत भारामध्ये); कालावधी- केव्हा उपलब्ध आहे (दिवसाच्या कोणत्या वेळी, कोण-कोणत्या दिवशी, कोणत्या हंगामात); आणि खर्च- त्यासाठी किती खर्च झालेला असेल.

(जी) **"मुल्यांकन, मापन आणि पडताळणी (इएमव्ही)"** म्हणजे डीएसएम किंवा ऊर्जा कार्यक्षम कार्यक्रम किंवा त्यांची बाजारपेठेतील सद्यस्थिती यांचे मूल्यांकन, संनियंत्रण, मापन आणि पडताळणी करणारी कार्ये;

(एच) **" उपयोगिता कालावधी "** म्हणजे या कार्यक्रमाखाली सूरू केलेले डीएसएम उपाय-जे अद्याप चालू आहेत आणि जे पुढे चालू राहू शकतील अशा वर्षांची अंदाजित संख्या;

(आय) **"विद्युत भार संशोधन"** म्हणजे विद्युत उद्योगाखाली सेवा घेत असलेल्या ग्राहकांकडून सर्वसाधारणपणे वापरण्यात येत असलेल्या विद्युत भाराची वैशिष्ट्ये आणि कलाची पूर्ण व खात्रीदायक माहिती पूरविण्यासाठी लागणाऱ्या विद्युत भाराच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास आणि मापन समाविष्ट असणारे कार्य;

## ३. मुलभूत तत्त्वे

३.१ प्रत्येक वितरण परवानाधारक महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१० मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कार्यान्वयीन चौकट अनुसरेल आणि त्यातील विनियमांनुसार आवश्यक डीएसम कार्यक्रम आणि आराखडे आयोगाच्या मंजूरीसाठी सादर करेल.

३.२ वितरण परवानाधारक खालील बाबींसाठी या विनियमांचे मार्गदर्शन घेईलः-

(एक) डीएसएम कार्यक्रम आणि डीएसएम आराखडे आयोगाकडे मंजूरीसाठी सादर करताना;

(दोन) खर्च-लाभाच्या विश्लेषणासह ऊर्जा आणि मागणीवरील परिणाम आयोगाला सादर करताना.

## ४. खर्चाच्या परिणामकारकतेच्या निर्धारणाच्या पद्धतींची व्याप्ती

या विनियमांचा उपयोग, कार्यक्रम किंवा आराखडा यांचा, निर्णयातील काही घटकांवर जसे, इतर घटकांबरोबरच, डीएसएम उपाय/ कार्यक्रम, खर्च आणि परिणाम (दोन्ही, वीज-युनिट आणि मागणी-भारावर) डिस्काउंटचा दर, उपयोगिता काल, यांच्यावर आणि सोप्या गृहिताखाली आर्थिक परिणामकारकता अजमावण्यासाठी करण्यात येईल.

## ५. खर्चाच्या परिणामकारकतेचे निकष

(एक) या विनियमात पुढे नमुद केलेल्या खर्चाच्या परिणामकारकतेच्या निकषांची पूर्तता करणणारे डीएसएम कार्यक्रम आणि डीएसएम आराखडे वितरण परवानाधारक, आयोगाकडे मंजूरीसाठी सादर करेल.

(दोन) वितरण परवानाधारक एकूण स्रोतांवरील खर्चाच्या (टीआरसी) चाचणीचे मूल्यांकन, एक प्रमुख चाचणी म्हणून करेल; त्यानंतर ग्राहकांवरील उपायांच्या होणाऱ्या परिणामाची परिमापन (रेटपेयर-इंपॅक्ट मेझर-आरआयएम) चाचणी करेल; या चाचणीमुळे, कार्यक्रम कार्यान्वीत केल्यामुळे आणि त्यावरील झालेल्या खर्चामुळे वीज दरावर विपरीत परिणाम होणार नाही, याला पुष्टी मिळते;

(तीन) विजेच्या दरावर होणारा परिणाम (लाइफ-सायकल रेव्हेन्यु इंम्पॅक्ट-एलआरआय आरआयएम ) हा रुपये ०.०१ प्रति युनिट किंवा प्रचलित वीज दराच्या ०.१ टक्क्याहून, जे जास्त असेल त्याच्या, अधिक नसावा;

(चार) कार्यक्रमाची छाननी खालील नमूद केलेल्या निर्णयाच्या क्रमाने करण्यात येईलः

ए) एकूण स्रोतावरील खर्च (टीआरसी) एक प्रमुख चाचणी निक़षः ज्या डीएसएम कार्यक्रमात लाभांचे निव्वळ प्रचलित मूल्य (नेट प्रेझेंट व्हॅल्यू-एनपीव्ही) हे खर्चाच्या एनपीव्हीच्या तुलनेत जर धन संख्येत (पॉझिटिव्ह नंबर) असेल तर असे सर्व कार्यक्रम आरआयएम चाचणी द्वारे मूल्यांकन करण्यासाठी विचारात घेण्यात यावेत.

बी) आरआयएम चाचणीः ज्या डीएसएम कार्यक्रमांचा कर देणा-याकरिता खर्चाच्या तुलनेत लाभांचा एनपीव्ही धन संख्येत येत असेल तर असे कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी विचारात घेण्यात यावेत.

सी) एलआरआयआरआयएम चाचणीः जे डीएसएम कार्यक्रम आरआयएम चाचणीमध्ये धन संख्या दाखवीत नसतील असे कार्यक्रम, जर डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित केल्यामुळे वीज दरावर त्यांचा होणारा परिणाम हा प्रति युनिट रुपये ०.०१ किंवा प्रचलित वीज दराच्या ०.१

टक्क्याहून कमी असेल, जे जास्त असेल ते, कार्यक्रम कार्यान्वित करण्यात यावेत.

## ५.१ एकूण स्त्रोतांवरील खर्चाची चाचणीः

(एक) लाभांची एनपीव्ही (बी) आणि खर्चाची एनपीव्ही (सी) यांची परिगणना करुन प्रमुख आकस्मिक चाचणी करण्यात येईल. डीएसएम उपाय/कार्यक्रमांसाठी एनपीव्ही ही बी आणि सी मधील फरका इतकी निश्चित करण्यात येईल.

जेथे,

बी= विनिर्दिष्टीत कालावधीमध्ये डिसकाउंट केलेली उपाय /कार्यक्रमांच्या लाभाची एनपीव्ही

सी= विनिर्दिष्टीत कालावधीमध्ये डिसकाउंट केलेली उपाय/कार्यक्रमांच्या खर्चाची एनपीव्ही

जर, ''टी'' या वर्षातील उपाय/ कार्यक्रमांचे लाभ समजा ''बीटी'' असतील आणि डिस्काउंटींगचा दर ''आर'' असेल, डिस्काउंटींगसाठी वेळेचा कालावधी ''एन'' वर्ष असेल तर ''बी'' खालील प्रमाणे व्यक्त करण्यात येईल :-

$$B = \sum_{t=1}^{n} [(B_t)/ (1+r)^{t-1}] \quad \text{(equation 1)}$$

तसेच, जर, ''टी'' या वर्षातील उपाय / कार्यक्रमांचे खर्च समजा ''सीटी'' असतील आणि डिस्काउंटींगचा दर ''आर'' असेल, डिस्काउंटींगसाठी वेळेचा कालावधी ''एन'' वर्ष असेल तर ''सी'' खालील प्रमाणे व्यक्त करण्यात येईलः-

$$C = \sum_{t=1}^{n} [(C_t)/ (1+r)^{t-1}] \quad \text{(equation 2)}$$

(दोन) टीआरसी चाचणीसाठी खर्चाच्या बाबी खालील मुद्दे विचारात घेऊन निश्चित करण्यात येतील :

ए) कार्यक्षम उपकरणे/साधन-सामुग्री/उपयंत्र/तंत्रज्ञान किंवा प्रथांवरील खर्च, लागू असलेले कर, शुल्क आणि लेव्ही; यासह

बी) कार्यक्षम उपकरणे/साधन-सामुग्री /उपयंत्र/ प्रथा/ तंत्रज्ञान यांची मांडणी करण्याचा, वापरपूर्व प्रारंभिक चाचणीचा आणि सुरु करण्याचा खर्च;

सी) उपायाच्या/कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीतील वार्षिक संचालन व देखभाल खर्च;

डी) जुनी अकार्यक्षम साधनसामुग्री काढून टाकण्याचा व निकाली काढण्याचा खर्च (जर डीएसएम उपाय/ कार्यक्रमात जुन्या वस्तुंऐवजी दुसऱ्या वस्तु किंवा जुन्या वस्तु दुरुस्त करुन घेण्याची तरतूद असेल तर)

इ) कार्यक्रमाच्या प्रशासन, संनियंत्रण आणि मूल्यांकनावरील खर्च;

एफ) कार्यक्रमाच्या प्रसिध्दीवर झालेला खर्च

टिपणी- जर काही टॅक्स क्रेडीट्स देण्यात येत असतील तर त्यावरील खर्च हा खर्चातील कपात म्हणून विचारात घेण्यात येईल. त्याचप्रमाणे जर कोणतीही जुनी साधनसामग्री/ उपकरण/ उपयंत्र/ तंत्रज्ञान इ. विकून त्याऐवजी नवीन घेण्यात येत असेल तर अशा जुन्या साधनसामग्री/उपकरणाची विक्री करुन मिळणारी रक्कम ही खर्चातील कपात म्हणून विचारात घेण्यात येईल.

डीएसएम कार्यक्रम किंवा डीएसएम उपाय यापासूनचा लाभ म्हणजे विजेच्या वापरात (युनिट) आणि/ किंवा मागणीमध्ये (भारात) होणारी बचत होय. युनिटमधील बचतीची परिगणना ही संबंधीत ऊर्जा कार्यक्षम उपयंत्र / उपकरण वर्षातील किती दिवस व प्रत्येक दिवशी किती तास वापरण्यात आले, याच्या आधारे करण्यात येईल. अशी बचत बहुधा वीज वापराच्या ठिकाणी होत असते आणि डीएसएम उपायांची मांडणी करुन घेणाऱ्या किंवा डीएसएम कार्यक्रमात

सहभागी होणाऱ्या ग्राहकाला अशा बचतीचा अनुभव येत असतो. परवानाधारकाने किती विजेची खरेदी करण्याचे टाळले ते काढण्यासाठी, वरील प्रकारे वापराच्या ठिकाणी होणाऱ्या बचतीचे यंत्रणेच्या पारेषण आणि वितरण हानीत वाजवी समायोजन करण्यात येते. ज्या कालावधीसाठी निर्धारण करावयाचे असते त्या कालावधीकरिता अशा लाभांची किंमत काढावी लागते.

अशा रितीने, विजेच्या वापराच्या ठिकाणी जर ''टी'' या वर्षातील बचत ''$\Delta S$ '' असेल, आणि त्याच वर्षातील पारेषण व वितरण हानि अनुक्रमे ''टीएलटी'' आणि ''डीएलटी'' असेल, तर ''टी'' या वर्षातील परवानाधारकाने टाळलेली वीज खरेदी (एपीपीटी) खालील प्रमाणे असेल.

$$= \Delta S_t/[(1\text{-}TL_t) \times (1\text{-}DL_t)]$$

जर ''टी'' या वर्षातील वीज खरेदीचा दर ''आरटी'' असेल तर ''टी''या वर्षातील टाळलेल्या वीज खरेदीवरील खर्च (एपीपीसीटी) असेल $= APP_t \times R_t$

परवानाधारकाच्या सरासरी आनुषंगिक सर्वोच्च मागणीमध्ये होणाऱ्या कपातीमुळे '' राज्यांतर्गत पारेषण आकारां''मध्ये कपात झाल्यास, अशा कपातीचा विचार या चाचणीखाली ''लाभ'' म्हणून करण्यात येईल. वीज आणि विद्युत भारातील बचतीची परिगणना करताना त्यात दरवर्षी ५ % इतकी वाढ विचारात घेण्यात यावी. चाचणीमध्ये १०.५ % इतका डिस्काऊंट दर विचारात घेण्यात यावा.

लाभ आणि खर्च या दोन्ही बाबींची परिगणना, उपयोगात आणण्यात येत असलेल्या तंत्रज्ञानाच्या उपयोगिता कालावधीसाठी, करण्यात येईल. विचारात घेतलेली बचत उपकरणे/उपयंत्रे यांच्या संपूर्ण उपयोगिता कालावधीत उपलब्ध होणे महत्त्वाचे असल्याने, वितरण परवानाधारक हा तंत्रज्ञानाच्या पुरवठादाराने दुरुस्त केलेल्या वस्तुच्या ''हमी'' कालावधीचा वापर करेल, यावर दुसरा उपाय म्हणजे, डीएसएम सल्लागार समितीने '' उपयोगिता कालावधी'' ची जी व्याख्या केली असेल त्यानुसार वापर करण्यात येईल.

## ५.२ ग्राहकांवरील परिणामाची परिमापन चाचणी

(एक) खाली नमूद केलेल्या खर्चाच्या भागांचा वापर समीकरण (इक्वेशन)-१ मध्ये करण्यात येईलः

ए) कार्यक्षम उपकरण/ साधनसामग्री/ उपयंत्र/ तंत्रज्ञान किंवा प्रथा यावरील खर्चासह लागू असलेले कर, शुल्क व लेव्हीज इ., जे परवानाधारकाने अदा केले आहेत किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका

बी) कार्यक्षम उपकरण/ साधनसामग्री/ उपयंत्र/ प्रथा/ तंत्रज्ञान यांची मांडणी, वापरपूर्व प्रारंभिक चाचणी आणि सुरु करण्यावरील खर्च, जो परवानाधारकाने अदा केला आहे किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका

सी) उपाय/कार्यक्रमाच्या संपूर्ण उपयोगिता कालावधीत वार्षिक संचालन व देखभालीवरील खर्च, जो परवानाधारकाने अदा केला आहे किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका

डी) जुने अकार्यक्षम उपकरण काढून टाकण्यावर आणि निकाली काढण्यावर झालेलला खर्च ( जर डीएसएम उपायात/कार्यक्रमात जुन्या वसुऐवजी दुसरी वस्तु घेण्याची/दुरुस्त करुन घेता येत असेल तर), जो परवानाधारकाने अदा केला आहे किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका

इ) कार्यक्रम प्रशासन, संनियंत्रण आणि मूल्यांकन खर्च, जो परवानाधारकाने अदा केला आहे किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका

एफ) कार्यक्रमाच्या प्रसिध्दी व प्रोत्साहनांवर झालेला खर्च, जो परवानाधारकाने अदा केला आहे किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका

जी) डीएसएम कार्यक्रमामुळे परवानाधारकाच्या महसुलात झालेली घट.

(दोन) डीएसएम कार्यक्रमाच्या लाभाची परिगणना ''वीज खदेदीचा टाळलेला खर्च '' म्हणून करण्यात येईल. जर डीएसएम कार्यक्रम/ उपायांनमुळे विजेच्या वापराच्या ठिकाणी ''टी'' या वर्षातील बचत '$\Delta S$ ''असेल आणि त्याच वर्षातील टक्केवारीतील पारेषण आणि वितरण हानि जर अनुक्रमे ''टीएलटी आणि डीएलटी'' असेल आणि त्या वर्षातील वितरण परवानाधारकाने ''टी'' या वर्षात टाळलेली वीज खरेदी (एपीपीटी) ही खालीलप्रमाणे असेलः

$$= \Delta S_t/[(1-TL_t) \times (1-DL_t)]$$

जर वीज खरेदीचा ''टी'' या वर्षातील दर ''आरटी'' असेल तर, टाळलेल्या वीज खरेदीवरील ''टी'' या वर्षातील खर्च (एपीपीसीटी) असेल $= APP_t \times R_t$

(तीन) परवानाधारकाच्या सरासरी आनुषंगिक सर्वोच्च वीज मागणीत झालेल्या कपातीमुळे जर ''राज्यांतर्गत पारेषण आकारात'' कपात झाली तर अशी कपात या चाचणी खाली ''लाभ'' म्हणून विचारात घेण्यात येईल.

(चार) वीज आणि विद्युत भाराच्या लाभाची परिगणना करताना दर वर्षी वाढीचा दर ५ %विचारात घेण्यात यावा.

टीप :- चाचणीमध्ये डिस्काउंट दर १०.५ % इतका विचारात घेण्यात यावा.

(पाच) लाभ आणि खर्च या दोघांची परिगणना, उपयोगात आणण्यात येत असलेल्या तंत्रज्ञानाच्या ''उपयोगिता कालावधीसाठी'', करण्यात येईल.

(सहा) विचारात घेतलेली बचत उपकरणे/उपयंत्रे यांच्या संपूर्ण उपयोगिता कालावधीत उपलब्ध होणे महत्त्वाचे असल्याने, वितरण परवानाधारक हा तंत्रज्ञानाच्या पुरवठादाराने दुरुस्त केलेल्या वस्तुच्या ''हमी'' कालावधीचा उपयोग करेल, यावर दुसरा उपाय म्हणजे, डीएसएम सल्लागार समितीने '' उपयोगिता कालावधी'' ची जी व्याख्या केली असेल त्यानुसार वापर करण्यात येईल.

## ५.३ वीज दरावर होणारा परिणाम-आरआयएम चाचणी

(एक) या विनियमांच्या कलम ५.२ मध्ये नमूद केलेल्या आयएम चाचणीची परिगणना करण्यासाठी वापरलेल्या माहितीचा उपयोग करुन एलआरआय-आरआयएम चाचणी करण्यात येईल;

(दोन) सहभागी न झालेल्या ग्राहकांवरील वीज दराचा परिणाम निश्चित करण्यासाठी खर्चाची एनपीव्ही आणि लाभांची एनपीव्ही यांच्या वजाबाकीला विद्युत कंपनीच्या एकुण विक्री-युनिट्सने भागण्यात येईल.

(तीन) सहभागी झालेल्या ग्राहकांवरील खर्चाची चाचणी (पीसीटी) आणि सोसायटल खर्चाची चाचणी (एससीटी) जरी निर्णय घेताना विचारात घेण्यात येत नसल्या तरी वितरण परवानाधारक या दोन्ही चाचण्यांचे निष्कर्ष आयोगाला कळवेल. पीसीटी आणि एससीपी चाचण्या करावयाची पद्धत या विनियमांच्या जोडपत्र-१ मध्ये विशद करण्यात आली आहे.

## ६. विजेच्या तुटवड्याच्या परिसस्थितीकरीता दुरुस्त करावयाचे घटक

(एक) नव्याने बसविलेला, दुरुस्त केलेला किंवा बदललेला डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित होण्यापूर्वी आणि कार्यान्वित झाल्यानंतरच्या, ग्राहकांच्या वीज वापरांच्या तासांबद्दलची अचूक माहीती, वीज तुटवड्याच्या परिस्थितीत खर्चाच्या परिणामकारकतेच्या चाचणीसाठी वापरण्यात येईल.

(दोन) डीएसएम कार्यक्रम कार्यान्वित झाल्यानंतरच्या प्रत्यक्ष वीज वापराच्या तासाच्या संख्येचा आढावा घेण्यासाठी, वीज तुटवड्याच्या परिस्थितीत अनुसरावयाच्या परिमापन आणि पडताळणी प्रक्रिया ठरविण्यात येतील.

## ७. चाचण्यांमध्ये वापरलेल्या महत्त्वाच्या घटकांची किंमत

राज्यातील सर्व परवानाधारकांनी विचारात घ्यावयाची स्थिर घटकांची किंमत खालील प्रमाणे राहील.

ए) टीआरसी, आरआयएम आणि पीसीटी करीता टाळलेल्या वीज खरेदीचा खर्च- महाराष्ट् राज्य भार प्रेषण केंद्राने मागील एक वर्षाकरिता परिगणना केलेल्या ऊर्जा वापराच्या स्टॅकच्या पहिल्या १०% शी संबंधित वीज खरेदीच्या सर्वोच्च सीमांतिक खर्चाची भारांकित सरासरी

बी) एससीटी करिता टाळलेल्या वीज खरेदीचा खर्च - प्रती युनिट रुपये १०.६ (डिझेलवरील निर्मिती संचाकरिता प्रचलित)

सी) विजेच्या विक्रीतील, टाळलेल्या वीज खरेदीच्या खर्चातील वाढीचा दर - दर वर्षी ५ %

डी) टीआरसी आणि आरआयएम चाचण्याकरिता डिस्काउंट दर - १०.५ %

इ) पीसीटीकरिता डिस्काउंट दर १३ %

एफ)एससीटीकरिता डिस्काउंट दर १० %

(दोन) आयोग, वरील किंमतीत, आवश्यकता असल्यास, दर वर्षी सुधारणा करेल.

## ८. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील कोणत्याही तरतूदी अमंलात आणताना जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर आयोग सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अधिनियमाशी विसंगत नसेल अशी आणि आयोगाच्या मते अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी जी कार्यवाही करणे आवश्यक किंवा इष्ट असेल, अशी योग्य कार्यवाही आयोग करु शकेल.

## ९. आदेश आणि कार्य-प्रणाली निदेश

अधिनियमातील तरतूदींना अधीन राहून, या विनियमांच्या अंमलबजावणीसाठी, आयोग वेळोवेळी आदेश, परिपत्रके आणि कार्य-प्रणाली निदेश निर्गमित करु शकेल.

## १०. सुधारणा करण्याचे अधिकार

आयोग कोणत्याही वेळी या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरफार, अल्प बदल, सुधारणा करु शकेल.

## जोडपत्र-१ : पीसीटी व एससीटी चाचण्या करावयाच्या पध्दती

## अ-१ सहभागीदारांवरील खर्चाची चाचणी (पीसीटी )

या चाचणीमुळे "साधारण" ग्राहकाला डीएसएम कार्यकर्मांमध्ये सहभागी झाल्यामुळे लाभांची व खर्चांची संख्यात्मक स्वरुपात कल्पना येते. अनेक ग्राहकांचा डीएसएम कार्यकर्मांमध्ये सहभागी होण्याचा निर्णय पूर्णतः संख्यात्मक स्वरुपातील लाभाच्या घटाकांवर आधारित नसल्यामुळे, (अनेक वेळा एखादे उपयंत्र/उपकरण/साधनसामग्री खरेदी करण्याचा ग्राहकाचा निर्णय देण्यात आलेली सूट, वैशिष्ट्ये, ब्रॅन्डचे मूल्य, प्रारंभिक खर्च इ. यासारख्या घटकांवर अवलंबून असतो), या चाचणीमुळे ग्राहकाला कार्यक्रमाच्या लाभांची व खर्चाची पूर्ण कल्पना येऊ शकणार नाही.

### ए.१.१ खर्च

सोप्या शब्दात, या चाचणीतील खर्च म्हणजे कार्यक्रमात सहभागी होणा-याने कार्यक्रमाचा अदा केलेला खर्च, होय. याशिवाय, डीएसएम कार्यक्रमामुळे सहभागीदाराच्या वीज देयकात झालेली कोणतीही वाढ ही देखील या चाचणीखाली खर्च म्हणून समजण्यात येते. अशा रितीने, या चाचणीशी बहुधा संबंधित असलेले ''खर्चाचे''' भाग खालीलप्रमाणे आहेतः-

- कार्यक्षम उपकरण/साधनसामग्री/उपयंत्र/तंत्रज्ञान किंवा प्रथा यावरील खर्चासह लागू असलेले कर, शुल्क व लेव्हीज इ., जे सहभागीदाराने अदा केले आहेत किंवा त्याने अदा केलेल्या खर्चाइतका
- कार्यक्षम उपकरण/ साधनसामग्री/ उपयंत्र/ प्रथा/ तंत्रज्ञान यांची मांडणी, वापरपूर्व प्रारंभिक चाचणी आणि सुरु करण्यावरील खर्च, जो सहभागीदाराने अदा केला आहे किंवा त्याने केलेल्या खर्चाइतका
- उपायाच्या/कार्यक्रमाच्या संपूर्ण उपयोगिता कालावधीत वार्षिक संचालन व देखभालीवरील खर्च, जो सहभागीदाराने अदा केला आहे किंवा त्याने केलेल्या खर्चाइतका
- जुने अकार्यक्षम उपकरण काढून टाकण्यावर झालेला खर्च ( जर डीएसएम उपायात/कार्यक्रमात जुन्या वस्तुऐवजी दुसरी वस्तु

घेण्याची/दुरुस्त करुन घेणे अभिप्रेत असेल तर), जो सहभागीदाराने अदा केला आहे किंवा त्याने केलेल्या खर्चाइतका

- कार्यक्रमाचा प्रशासन, संनियंत्रण आणि मूल्यांकन खर्च, जो सहभागीदाराने अदा केला आहे किंवा त्याने केलेल्या खर्चाइतका
- कार्यक्रमाच्या प्रसिध्दी व प्रोत्साहनांवर झालेला खर्च, जो परवानाधारकाने अदा केला आहे किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या खर्चाइतका
- डीएसएम कार्यक्रमामुळे सहभागीदाराच्या वीज देयकात झालेली वाढ

जर कोणतीही जुनी साधनसामग्री/ उपकरण/ उपयंत्र/ तंत्रज्ञान इ. विकून त्याऐवजी नवीन घेण्यात येत असेल तर अशा जुन्या साधनसामग्री/उपकरणाची विक्री करुन मिळणारी रक्कम ही खर्चातील कपात म्हणून विचारात घेण्यात येते.

त्याचप्रमाणे, ग्राहकाला जर टॅक्स क्रेडीट/प्रोत्साहन देण्यात येत असेल तर ते खर्चातील कपात म्हणून समजण्यात येईल. रुढीनुसार, अशी टॅक्स क्रेडीट्स/प्रोत्साहने ही डीएसएम कार्यक्रमात सहभागीदाराला मिळणारे लाभ म्हणून समजण्यात येतील.

### ए.१.२ लाभ

ग्राहकाच्या वीज देयकात झालेली कपात, ग्राहकाला मिळालेले टॅक्स क्रेडिट्स आणि प्रोत्साहने हे या चाचणीखालील लाभ आहेत.

### ए. १. ३ वाढीचा दर

वीज दरात तदर्थ तत्त्वावर शिफारस केलेला वाढीचा दर हा ५ % आहे किंवा या विनियमातील अनुक्रमांक ७ खाली सुधारित केल्याप्रमाणे असेल.

### ए.१.४ डिस्काउंट दर

या चाचणीसाठी आदर्श डिस्काउंट दर हा बँका आणि वित्तीय संस्था ज्या दराने ग्राहकांना कर्ज देतात तो असणे योग्य राहील. त्यामुळे, ग्राहकाच्या पत दर्जानुसार या दरात बदल होण्याची शक्यता आहे. कुटुंबासाठी, हा दर वाणिज्यिक क्षेत्र अथवा औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांपेक्षा जास्त असण्याची

शक्यता आहे. तथापि, ग्राहकांच्या सर्व वर्गवारींकरिता डिस्काउंट दर १३ टक्के धरता येईल किंवा तो या विनियमांच्या अ.क्र. ७ खाली सुधारित केल्याप्रमाणे असेल.

## ए.१.५ चाचणीचे निष्कर्ष

एनपीव्ही हे प्रारंभिक मूल्यांकन निकष म्हणून वापरण्यात येईल. एनपीव्ही मूल्य शून्य किंवा त्याहून अधिक असल्यास त्यावरुन पीसीटी चाचणीकरिता मूल्यांकन करण्यात येत असलेला डीएसएम उपाय किंवा कार्यक्रमाने ही चाचणी उर्तीण झाल्याचे निर्देशित होईल. त्यावरुन असे देखील दिसून येईल की सहभागी होणाऱ्या "साधारण" ग्राहकांसाठी डीएसएम कार्यक्रम लाभदायक आहे. याविरुद्ध, एनपीव्ही मूल्य शून्यापेक्षा कमी असल्यास त्यावरुन पीसीटी चाचणीकरिता मूल्यांकन करण्यात येत असलेला डीएसएम उपाय किंवा कार्यक्रमाने ही चाचणी उत्तीर्ण न झाल्याचे निदर्शक आहे, म्हणजे त्यामुळे अशा डीएसएम कार्यक्रमांत सहभागी होणे ग्राहकाला लाभदायक ठरणार नाही.

या चाचणीखाली टॅक्स क्रेडिट्स आणि प्रोत्साहने ही एनपीव्ही समीकरणाच्या लाभाच्या बाजूला असतात. अशा रितीने, डीएसएम कार्यक्रमांच्या लाभाच्या बाजूत, प्रोत्साहने अथवा टॅक्स क्रेडिट्स (यापूर्वी दिली नसल्यास) देऊन किंवा (ती यापूर्वीच देण्यात येत असल्यास) अधिक मोठ्या प्रमाणात देऊन, भर घालता येईल. ज्या डीएसएम कार्यक्रमामध्ये एनपीव्ही मूल्य ऋण दाखविण्यात येते, त्यावरुन असे डीएसएम कार्यक्रम सहभागी होणाऱ्या ग्राहकाच्या दृष्टिकोनातून लाभादायक ठरण्यासाठी, देणे आवश्यक असलेल्या टॅक्स क्रेडिट्स/प्रोत्साहनांची किमान पातळी, पीसीटी चाचणीद्वारे निर्देशित होते. ज्या कार्यक्रमांचे एनपीव्ही मूल्य शून्य असते अशा कार्यक्रमांकरिता, हे किमान मूल्य टॅक्स क्रेडिट्स/प्रोत्साहनाच्या मूल्याइतके असते.

एनपीव्ही मूल्यावर प्रत्येक गृहिताच्या होणा-या परिणामाची पातळी समजून घेण्यासाठी विविध गृहितांच्या संबंधात देखील संवेदनशीलता विष्लेषण करुन घेणे उचित ठरेल.

## ए-२ सोसायटल खर्चाची चाचणी (एससीटी)

सोसायटल खर्चाची चाचणी ही रचनेच्या दृष्टीकोनातून एकूण स्त्रोताच्या खर्चाच्या (टीआरसी) चाचणीसाखीच असते. तथापि, एकूण स्त्रोतांच्या खर्चातील बदल टीआरसी चाचणीत फक्त परवानाधारकाच्या आणि त्याच्या ग्राहकांच्या कार्य-क्षेत्रात संख्यात्मक रुपात दाखविण्यात येत असले तरी सोसायटल

खर्चाच्या चाचणीत हे बदल संपूर्ण समाजाकरीता संख्यात्मक रुपात दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे, काही घटकांकरीता, जसे- वीज खरेदीचा दर, डिस्काउंट दर इ.करीता वेगवेगळे मूल्य विचारात घेणे आवश्यक आहे. विशेष करुन, सोसायटल चाचणी ही खालील बाबतीत टीआरसी चाचणीपेक्षा वेगळी आहेः-

- वीज खरेदी करावयाच्या दराचे मूल्य हे "विजेचा सामाजिक खर्च" असणे गरजेचे राहील, ज्याचा विचार विजेसाठी ग्राहक अदा करण्यास तयार असलेली रक्कम किंवा ग्राहक विजेसाठी अदा करण्यास तयार असलेली किंमत, म्हणून करता येईल. भारताच्या संदर्भात, डिझेलवरील वीज निर्मितीचा खर्च हा ग्राहकांच्या विजेसाठी रक्कम अदा करावयाच्या तयारीचे प्रतिनिधित्व करु शकेल आणि अशा रितीने, विजेचा सामाजिक खर्च हा डिझेलवरील वीज निर्मितीचा खर्च म्हणून मानता येईल. या चाचणीची परिगणना करण्याच्य प्रयोजनासाठी, डिझेलवरील वीज निर्मितीचा खर्च प्रति युनिट रु १०,६० इतका किंवा या विनियमांच्या अनुक्रमांक ७ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे वापरण्यात यावा
- कर, शुल्क, लेव्हीज, टॅक्स क्रेडिट्रस इ. हे सोसायटल चाचणीमध्ये हस्तांतरण अदायगी (ट्रान्सफर पेमेंट) म्हणून विचारात घेण्यात येत असल्यामुळे, परिगणना करताना ते वगळण्यात यावेत
- एससीटी चाचणी खाली डिस्काउंट करण्याचा दर सोसायटल डिस्काउंट दर राहील. डीएसएम कार्यक्रमाच्या संर्दभात, परवानेधारक सोसायटल डिस्काउंट दर १० % वापरु शकतील किंवा या विनियमांतील अनुक्रमांक ७ मध्ये सुधारित करण्यात येईल ल्याप्रमाणे वापरण्यात यावा.

डीएसएम कार्यक्रमांचे अप्रत्यक्ष लाभ, म्हणजे हरित गृहातून बाहेर पडणाऱ्या वायू मधील कपात जी डीसएम उपायामुळे होते, सोसायटल खर्चाच्या चाचणीची (एससीटीची) परिगणना ते करताना विचारात घेण्यात यावेत.

(के. एन. खवारे)
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

ठिकाणः मुंबई
दिनांकः २६ एप्रिल, २०१०